MHRG110010772021

रे.दि.मु.क्र.८६/२०२१
(पांडुरंग नाटेकर वगैरे वि. सदाशिव साळुंखे)

## नियमित दिवाणी दावा क्र.८६/२०२१ मधील नि.४० खालील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज ऑर्डर १ रुल १० प्रमाणे जादा पक्षकार करणेकामी व दावेकामी नि.१ मध्ये तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादींविरुध्द कराराची विशेष पुर्तता करुन मिळणेकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. सदरील अर्जात वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकत राजाराम लक्ष्मण साळुंखे यांच्या मालकीची असल्याबाबत तसेच सुवर्णा आंबौणकर, अशोक राजाराम साळुंखे, उषा मनोहर जागडे व प्रतिवादी सहा हे कै. राजाराम लक्ष्मण साळुंखे याचे वारस असल्याबाबत वाद नाही. प्रस्तुत दाव्यातील साठेखत राजाराम लक्ष्मण साळुंखे यांनी वादीस करुन दिले आहे. राजाराम लक्ष्मण साळुंखे दिनांक ०९.१२.२०२३ रोजी वर नमुद वारस मागे ठेवुन मयत झाले. वादीचा दावा सन २०२१ मध्ये दाखल झाला त्यावेळी वादीस राजाराम लक्ष्मण साळुंखे यांच्या वर नमुद वारसाची माहिती नव्हती. दरम्यान सन २०२३ मध्ये दावा मिळकतीबाबत CrPc-कलम-१४५ प्रमाणे तहसिलदार माणगांव यांच्याकडे दावा मिळकतीबाबत प्रकरण चालु होते. त्यावेळी राजाराम लक्ष्मण साळुंखे यांना प्रतिवादीसह वर नमुद वारस आहेत असे लक्षात आले. दाव्यातील साठेखत राजाराम लक्ष्मण साळुंखे यांनी वादीस करुन दिलेले असल्यामुळे ते साठेखत प्रतिवादी व वर नमुद इसमांवर बंधनकारक ठरते. अशा परिस्थितीत वर नमुद इसमांवर या दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. २ ते ४ कडे सामील करणे गरजेचे आहे. सबब वादी यांनी

दाव्यातील सरनाम्यामध्ये प्रतिवादी नं. १ नंतर प्रतिवादी क्र. २ ते ४ खालीलप्रमाणे दुरुस्ती करुन मागीतली आहे.

प्रतिवादी क्र. २. श्री.अशोक राजाराम साळुंखे,
व.व. ६९, धंदा–शेती,
रा. काळीज, पो. बिरवाडी,
ता. महाड, जि. रायगड.

प्रतिवादी क्र. ३. सौ.सुवर्णा शरद आंबौणकर,
व.व. ५०, धंदा–शेती,

प्रतिवादी क्र. ४. श्री.उषा मनोहर जागडे,
व.व. ५५, धंदा–शेती,
प्र.क्र. ३ व ४ रा.श्रध्दा चाळ,
प्रितम रामजी नगर, ओम साई मित्र मंडळ,
भटवाडी, घाटकोपर (प.) पिन.४०० ०८४.

३. प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्जावर म्हणणे सादर करुन असे कथन केले आहे की, सदरील अर्जातील मजकूर हा खोटा लबाडीचा असून त्यांना मान्य व कबूल नाही. मुळा वादी यांना दावा दाखल करतेवेळीच प्रतिवादी यांच्या वारसांची माहिती असताना देखील वादी यांनी आज तागायत पार्टी अॅडीशनचा कोणताही अर्ज दाखल करण्याचा प्रयत्न देखील केलेला नाही. मुळात दावा दाखल करताना वादी यांनी सादर

केलेल्या ७/१२ उता–यामध्ये प्रतिवादी यांची नावे होती. परंतु वादी यांनी सदरची नावे जाणुनबूजुन दाखल केलेली नाहीत. यावरुन वादी यांनी हा दावा केवळ प्रतिवादी यांना त्रास देण्याच्या हेतुने दाखल केलेला आहे हे सिध्द होते.

४. नि.४० वरील अर्ज, त्यापुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र व वादीतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत दावा हा कराराची पुर्तता करुन मिळणेकरिता आहे. वादीने सदरचा दावा हा केवळ सदा राजाराम साळुंखे यांच्याविरुध्द दाखल केला होता. वादीच्या म्हणण्याप्रमाणे वादीच्या हक्कामध्ये करार हा राजाराम लक्ष्मण साळुंखे यांनी करुन दिलेला आहे. राजाराम लक्ष्मण साळुंखे हे दिनांक ०९.१२.२०२३ रोजी मयत झाले. मयत राजाराम लक्ष्मण साळुंखे यांना सदा राजाराम साळुंखे व्यतिरिक्त इतर तीन वारसदार आहेत. प्रतिवादींना म्हणणे दाखल करुन सदर बाब मान्य केलेली आहे. अशा परिस्थितीत अर्जात नमूद केलेले प्रतिवादी क्र.२ ते ४ हे मयत राजाराम लक्ष्मण साळुंखे यांचे वारस असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे वादी कथन करत असलेल्या कराराच्या पुर्ततेकरिता मयत राजाराम लक्ष्मण साळुंखे यांचे सर्व वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहेत. दावा हा सुनावणीला लागला असतला आजतागायत वादीने पुरावा दाखल केलेला नाही, त्यामुळे सदर प्रतिवादी अभिलेखावर आल्याने इतर प्रतिवादींच्या हक्कास कोणतीही बाधा येत नाही. सदर अर्ज मंजूर झालेस दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय होण्यास मदतच होणार आहे. दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. त्यामुळे न्याय हिताचे दृष्टीने व वादीने

MHRG110010772021



केलेला विलंब विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज कॉस्टवर मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी क्र.४० वरील प्रतिवादी क्र.१ ला र.रु.२००/– खर्च (कॉस्ट) देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. दावा दुरुस्तीनंतर मुळ दाव्याची प्रत न्यायालयाकरिता व एक प्रत प्रतिवादींना देणेकरिता दाखल करावी.

SONTAKKE AHILYABAI BALIRAM

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2026.04.09 18:24:12 +0530

माणगाव. [श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]

दिनांकः-०९.०४.२०२६. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.